स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 30.04.2010 रोजी दुपारी 12.30 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंसी | सदस्या |
| 3. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 4. | सौ. ममता ठाकूर | सदस्या |
| 5. | श्री दिपक पटेल | सदस्य |
| 6. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 7. | सौ. शोभा पटेल | सदस्या |
| 8. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 10. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 11. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 12. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |

रिक्त स्थान – 4

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. विष्णुपद बुटे, अति. आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 19</u> :– नागपूर महानगरपालिकाचे मुखपत्र नागरिक जीवन मासिक पुढील आदेशापर्यंत सतत प्रकाशित करण्यास व त्यावर येणारा खर्च व मासिकाचे मुद्रण युनिक फिचर्स द्वारे करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 20</u> :– नागपूर महानगरपालिकेतील 30 भंगार वाहने, 2 रोड रोलर, लोखंडी भंगार विक्री करण्याकरिता ई–निविदेअंतर्गत प्राप्त महत्तम दरानुसार विक्री तसेच महत्तम दराचे संबंधित निविदाकार यांनी निविदा अटी–शर्ती नुसार साहित्याची उचल न केल्यास द्वितीय महत्तम दराचे निविदाकर (Offset किंमतीपेक्षा जास्त दर असणारे) यांना भंगार वाहने/रोड रोलर, लोखंडी भंगार विक्री करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 21</u> :– रामदासपेठ प्लॉट ओनर्स ॲन्ड रेसिडेंट् असोसिएशन नागपूर यांचे अर्जानुसार त्यांना रहदारी व वाहतुक योग्य प्रकारे व्हावी या दृष्टीकोणानतु एकुण 25 कार (चारचाकी) 55 (मोटार सायकल/स्कुटर) दुचाकी वाहनांकरीता पे ॲन्ड पार्क ची परवानगी देण्याचा व चार चाकी करीता रु. 1/– व दुचारी करीता 0.50/– पैसे या दरा नुसार रक्कम आकारण्याची परवानगी देवुन एका दिवसातुन एका तासाचे आकारणी एवढी म्हणजेच एका वर्षाची रु. 19,100/– एवढी रक्कम असोसिएशन ने म.न.पा.स दयावी, या अटि वर यांना फाटकाचे आतमध्ये 'पे–ॲन्ड पार्क' करीता परवानगी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 22</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध ठिकाणी स्वतःच्या मालकीच्या मैदानावर विद्युत व्यवस्था फार पूर्वी पासुन सुरु असून सध्याचे विजेचे दर लक्षात घेता येणारे विद्युत बील भरणे आर्थिक दृष्टिकोणातून महानगरपालिकेला परवडण्यासारखे नाही. या मैदानावर सुरु असलेले विविध क्रीडा मंडळाकडून या विजेच्या वापरावर अंकुश ठेवण्याच्या दृष्टिकोणातून ही क्रीडा मैदाने जी क्रीडा संस्था वापरत आहे त्यांचेकडून या विजेच्या बिलाचा भरणा करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन म.न.पा. चे क्रीडा धोरण निश्चित होई पर्यंत, ज्या क्रिडा संस्था विषयाच्या संबंधाने असलेली क्रीडांगणे वापरीत आहेत. अश्या संस्थेकडून विद्युत देयकाची 50% रक्कम म.न.पा. द्वारा वसूल करावी व त्यानंतर म.न.पा. ने 50% वाटा टाकुन पूर्ण देयकाचा भरणा करावा. या अटीसह या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 23</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता विविध साहित्य खरेदी करण्याकरिता रु. 99,99,886/– च्या प्राकलनास

मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून लघुनिविदा काढण्यासह हया विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 24</u> :— नागपूर शहरातील पाणी टंचाई क्षेत्रांमध्ये 115 मि.मी. व 150 मि.मी. व्यासाच्या विंधन विहीरी खोदण्याच्या कामाचे वार्षिक दर व एजेंसी निश्चीत करण्याचा कामाकरिता जाहिरातीद्वारे निविदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त निविदा संदर्भांत खाली प्रमाणे प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून

1. शहरातील संभाव्य पाणी टंचाई क्षेत्रात विंधन विहीरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेण्याकरिता प्रस्तावित मौक्यांच्या सर्वेक्षणाचे काम भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणामार्फत रु. 1000/— प्रति मौका सर्वेक्षण या शासन मंजूर दरावर करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली, तसेच विंधन विहीरी करीता प्रस्तावित जागा प्राधाण्याने निश्चित करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष स्थायी समिती व अध्यक्ष जलप्रदाय समिती, यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. 150 मि.मी. व्यासाचे विंधन विहीरी खोदण्याचे कामाचे निविदासंदर्भात खालील निम्नतम दरांना वार्षिक दर म्हणून मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या कामाकरिता दर व एजन्सी निश्चित करण्याकरिता बोलविण्यांत आलेल्या निविदातील, प्राप्त निम्नतम दरावर निविदाकारांनी काम करण्यास असमर्थता दर्शविल्याने हया निविदा रद्द करुन हे काम स्थायी समितीने यापूर्वी ठराव क्र. 12 दिनांक 07.04.2010 अन्वये घेतलेल्या निर्णया प्रमाणे जी.एस.डी.ए. मार्फत शासन दरावर करुन घेण्यास एकमताने मान्यता प्रदान करते, मात्र यशस्वी विंधन विहीरी उभारणीसाठी लागणारे हातपंप व जी.आय. पाईप्स संबंधीत खाजगी एजन्सी जी.एस.डी.ए. च्या मंजूर निकषाप्रमाणे आपल्या स्तरावर उपलब्ध करुन जी.एस.डी.ए. च्या तपासणी नंतर बसवतील असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

| Item No. | Description | Unit | Proposed Annual Rates |
|---|---|---|---|
| 1. | Drilling of 150 mm dia casing pipe medium class ERW mild steel black as per ISI 1239 SPECIFICATION with sockets and inserting in Borewells through over burden at least 0-20 m in Hard Rock inluding transporation to site of work cutting, threading and grounting the same with cement slury including cost of coupling and plug. | Rmt | 230 |
| 2. | Providing laying & Fixing 150mm dia. M.S. casing pipes of shell (requisite thicknes) etc. | Rmt | 1095 |

| | | | |
|---|---|---|---|
| | complete (IS 1239) | | |
| 3. | Yield testing of borewell using 900 degree 'V' notch by AIR lift method for two hours for successfully borewell and by instaling hand pump for one hour for yielding borewell and installation. | Job | 990 |
| 4. | Installing of telescoic pedestal 175x150 mm GI Hand Pump with cylinder as per ISI 31-1984 including lowering GI riser pipes 12mm dia connecting roads etc. completed. | Job | 600 |
| 5. | Construction of Cement Concrete platform, drain and soak pit as per approved disign and drawing of Unicef & GSDA including cost of meterial & labour etc... Completed. | Job | 3571 |
| 6. | Providing telescopic peddstal 155x150mm dia Galavnised India Mark-II hand pump set with cylinder as per IS 1990 (Amendedupto date) specification both unicef and ISI approved suitable for 150mm dia borewells with 10 Nos. (12mm dia) connecting rod including | Each | 7460 |
| 7. | Providing Q.I. riser pipes 3 meter length suitable for India Mar-II hand pump including transporation, octroi etc. completed. | Each | 462 |

3. 115 मि.मी. व्यासाचे विंधन विहीरी खोदण्याचे कामाचे खालील निम्नतम दरांना वार्षिक दर म्हणून मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली, तसेच विंधन विहीरी करीता प्रस्तावित जागा प्राधाण्याने निश्चित करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष स्थायी समिती व अध्यक्ष जलप्रदाय समिती, यांना देण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

| Item No. | Description | Unit | Proposed Annual Rates |
|---|---|---|---|
| 1. | Carrying out feasibility survey for drilling of borewell in Nagpur City. | Job | 1000 |
| 2. | Drilling of 115mm dia borewell perfectly vertical in all types of starta including Hard Rock, over burden below ground level from surface including transporation of machinery & equipment by inwell boing machine including mans shifting uknit charges etc. | Rmt | 208 |
| 3. | Providing, Laying & fixing PVC casing pipes of shell (requisite thickness) etc... Completed. | Rmt | 422 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4. | Yield tensting of borewell using 900 degre 'V' notch by AIR lift method for two hous for successfully borewell and by installing hand pump for one hour for yielding borewell and installation. | Job | 990 |
| 5. | Installing of telescoic pedestal 175x150 mm GI Hand Pump with cylinders as per ISI 31-1984 including lowering GI riser pipes 12mm dia connecting roads etc. Completed. | Job | 600 |
| 6. | Construction of Cement Concrete platform, drain and soak pit as per approved design and drawing of Unicef & GSDA including cost of meterial & labour etc. Completed. | Job | 3571 |
| 7. | Providing telescopic peddstal 155x150mm dia Galvanised India Mark-II hand pump set with cylinder as per IS 1990 (Amendedupto date) specification both unicef and ISI approved suitable for 150mm dia borewells with 10 Nos. (12mm dia) connecting rod including | Each | 7460 |
| 8. | Providing Q.I. riser pipes 3 meter length suitable for India Mar-II hand pump including transportation, octroi etc. completed. | Each | 462 |

4. वरील मंजूर दरावर काम करण्यास तयार असलेल्या इच्छुक निविदाकारांना/एजेंसी मार्फत शहरातील पाणीटंचाई वस्त्यात विंधन विहीर खोदण्याचे काम करवून घेण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून 115 मि.मी. विंधन विहीरी खोदण्याचे काम वरील मंजूर दरावर ईच्छूक निविदाकारा मार्फत विहीत तरतूदीच्या अधीन करवून घेण्यास एकमताने मान्यता देण्यांत येते.

5. वरील मंजुर एजेंसीद्वारे मंजुर दरावर शहरात पाणीटंचाई वस्त्यांमध्ये विंधनविहीरी खोदण्याची कामे संबंधीत पदाअंतर्गत अंदाजपत्रकीय तरतुदीच्या अधीन राहुन करवून घेण्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून म.न.पा. च्या अंदाजपत्रकीय तरतूदी अधिन कामाची अग्रीम रक्कम जी.एस.डी.ए. कडे जमा करण्यास एकमताने मंजूरी प्रदान करण्यांत येते.

6. उन्हाळा 10 मधील म.न.पा. चा विंधन विहीर खोदण्याचा कार्यक्रम राबविण्याच्या कामात Technical Supervision करण्याचे कामाकरिता GSDA नागपूर यांना खर्चाचे सात टक्के दरांवर नियुक्त करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून या व्यतिरीक्त शहरातील पाणी टंचाई वस्त्यांत 300 विंधन विहीरी खोदण्याच्या रु. 2.72 कोटीच्या प्रस्तावित खर्चास मान्यता प्रदान करण्यांत येते. व या करिता शासकीय अनुदान प्राप्त

करण्याची कार्यवाही करण्यास अनुमतीस एकमताने मान्यता प्रदान करण्यांत येते.

<u>ठराव क्रमांक 25</u> :– "मा. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन 2005–06" अंतर्गत, भंडारा रोड, भांडेवाडी, पारडी वॉर्ड क्र. 30 येथील कब्रस्थानात सिमेंट रस्ते तयार करणे, या बांधकामी मे. स्वीटी कन्स्ट्रशन, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा 21.12. टक्के कमी दराच्या रु. 10,65,695/– राशीच्या मंजूर निविदेचा कार्यकारी अभियंता (बांधकाम) व मे. स्वीटी कन्स्ट्रक्शन, नागपूर यांचे तील मंजूर करारनामा दिनांक 15.05.2008, करारातील अट क्र. 3 (क) अंतर्गत संपुष्टात आणून मे. स्वीटी कन्स्ट्रक्शन, नागपूर यांचे

1. उपरोलीखीत कामाचे कंत्राट त्यांचे आर्थीक जबाबदारीवर रद्द करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. त्यांची अनामत रक्कम जप्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. उर्वरित कामाकरिता पूनर्निविदा बोलाविण्यात येवून किंवा याच निविदेतील इच्छूक इतर निविदाकारास काम देवून, त्यांचे मंजूर निविदादर व मे. स्वीटी कन्स्ट्रक्शन, नागपूर यांचे निविदेतील दरातील येणारी फरकाची राशी मे. स्वीटी कन्स्ट्रक्शन, नागपूर यांना म.न.पा.कडून देय असलेल्या राशीतून वसूल करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 26</u> :– श्री. रामाजी कृष्णराव बुटे चपराशी चुंगी नाका नं. 4 विभाग म.न.पा. नागपूर हे चुंगी विभागात कार्यरत असतांनी त्यांची प्रकृती अचानक खराब झाल्यामुळे ब्रेन ऑपरेशन करीता डॉ. गिल्लुरकर हॉस्पीटल, नागपूर येथे भरती करण्यात आले. दवाखान्यात त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यात आली असुन त्यांचा झालेला एकुण खर्च अंदाजे 2,87,200/– च्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 27</u> :– नागपूर महानगरपालिके मार्फत JNNURM योजने अंतर्गत नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना पेंच–4, पार्ट – 1 व इतर प्रकल्पाकरीता म.न.पा च्या हिस्स्याची रक्कत उभारणी करीता बॅक ऑफ महाराष्ट्र कडून रु. 200 कोटी कर्ज घेण्याबाबत.

नागपूर महानगरपालिकेने दिनांक 3.3.2010 चे विशेष सभेमध्ये ठराव क्रमांक 59 दिनांक 3.3.2010 नुसार बॅक ऑफ महाराष्ट्र कडून रु. 200 कोटी कर्ज घेण्याबाबत मंजूरी प्रदान केली आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग , यांचे पत्र क्रमांक एन यु आर – 2010 / प्र.क्र.14/ नवि–33 दिनांक 30 मार्च 2010 नुसार रु. 200 कोटी कर्ज घेण्याबाबत मंजूरी प्रदान केलेली आहे. त्यानुसार बॅक ऑफ महाराष्ट्र, मनपा, सिव्हील लाईन्स शाखेकडून दिनांक 31.3.2010 ला रु. 200 कोटी कर्ज घेण्यात आले आहे. परंतू सद्यः स्थीतीत मनपा व्दारा बॅक ऑफ

महाराष्ट्र कडून 200 कोटी कर्जा पैकी प्रथमतः रु. 50 कोटीची उचल करण्यात आली आहे. सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या माहितीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेवुन माहितीची नोंद एकमताने घेवून, उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने 9.5% दराने घेतलेल्या व्याजाचा आर्थिक बोजा कमी करण्याच्या दृष्टीने बॅंक ऑफ इंडिया यांनी दिलेला 8.5% दराचा प्रस्ताव एकमताने मंजूर करते. तसेच 8.5% कर्जाची उचल करुन याच विषयासाठी यापूर्वी 9.5% दरानी घेतलेल्या बॅंक ऑफ महाराष्ट्रचे कर्जाची पूर्ण रकमेची परतफेड करावी यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 28 :– वार्ड क्रमांक 60 मधील हिवरी ले आऊट व झोपडपट्टीमध्ये पाण्याच्या नविन वितरण जलवाहिन्या टाकण्याच्या कामाच्या ई–निविदा बोलविण्यात आल्या असता मे. बालाजी यांची प्राकलनीय दराएवढी रु. 23,87,049/– किमतीची एकमेव निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 29 :– प्रवर्तन विभाग म.न.पा. तर्फे विविध कार्यवाहीच्या माध्यमातून जप्ती केलेल्या सामानांचा जाहीर लिलाव करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्यांचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच खालील प्रमाणे समिती गठीत करण्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. श्री. राजेश माटे
2. श्री. सुरेश तळवेकर
3. श्री. कावळे, प्रमुख लेखा तथा वित्त अधिकारी

ठराव क्रमांक 30 :– नविन प्रशासकिय इमारतीमध्ये अग्नीशामन विभागाकरिता कारपेन्ट्री फर्निचर ची मजबूती व उपयोगीतता तपासण्याकरीता MOCK UP तयार करण्यात आलेले असून या कामाची प्राकलनिय राशी रुपये 23,84,803=00 आहे. MOCK UP करणाऱ्या कंपनी M/s FORMS यांना प्राकलनिय दरापेक्षा 15.21% कमी दरावर कार्योत्तर मंजूरी (Post facto) व भुगतान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 31 :– नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग व झोनल कार्यालयामध्ये दैनंदिन कामाकरिता लागणारी आवश्यक कार्यालयीन स्टेशनरी व साहित्य नविन द्वि वार्षीक दर करार निश्चित करण्याकरिता जाहिरात क्र. 245/ई/पी.आर./2010 दिनांक 16.02.2010 अन्वये ई–निविदा सुचनांची जाहिरात स्थानिक दैनिक कर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली असता एकूण 4 निविदा धारकांनी ई–निविदा सादर केल्या ते खालील प्रमाणे आहेत.

1) मेसर्स. गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, नागपूर

2) मेसर्स. पी. ॲन्ड जी सेल्स कार्पोरेशन, नागपूर

3) मेसर्स. संतकृपा मुद्रणालय, नागपूर

4) मेसर्स. वी.के.एस. ऑरगनायजेशन, नागपूर

या निविदा धारकांपैकी मेसर्स. संतकृपा मुद्रणालय, नागपूर व मेसर्स. वी. के.एस. ऑरगनायजेशन, नागपूर यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे आवश्यक कागदपत्रे बरोबर नसल्यामुळे त्यांची दरसुची उघडण्यात आलेली नाही. तसेच मेसर्स. गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, व नागपूर मेसर्स. पी. ॲन्ड जी. सेल्स कार्पोरेशन, नागपूर यांनी निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे कागदपत्रे बरोबर असल्यामुळे त्यांची दरसुची उघडण्यात आली. त्युानसार तुलनात्मक दराचा तक्ता तयार केला असता निविदेच्या अंतर्गत वेगवेगळया साहित्याकरिता संबंधित निविदा धारकांचे वेगवेगळे दर असल्यामुळे प्रत्येक साहित्या करिता विभागाला प्राप्त निम्मत्तम दर हे सिलींग दर म्हणून त्या त्या साहित्या करिता निश्चित धरण्यांत येवून कार्यालयीन स्टेशनरी व साहित्याचे जे नविन दर मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे त्या दराप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग व झोनल कार्यालयाकरिता दोन वर्षाचे कालावधीकरिता (सन 2010–2011 व 2011–2012) **1) मेसर्स. गुरुकृपा स्टेशनर्स ॲन्ड प्रिंटर्स, नागपूर 2) मेसर्स. पी. ॲन्ड जी. सेल्स कार्पोरेशन, नागपूर** यांचे कडून खरेदी करण्यास्तव व येणारा खर्च प्रतिवर्ष रुपये 40 लाखाच्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 32</u> :– शासकीय तंत्र माध्यमीक शाळा, सिताबर्डी येथील शाळेची {लोककर्म विभाग} इमारत बांधण्याकरिता प्राप्त तिन निविदापैकी मे. एस.एस. पाटील ॲन्ड कंपनी यांची प्राकलनीय राशीपेक्षा 1.11 टक्के ने कमी दर असलेली रु. 1,71,73,476.00 रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

कामाचा खर्च **JN-124** अंतर्गत करण्यात येईल.